महाराष्ट्र टाइम्स, ५ नोव्हें., २०१०, पृष्ठ क्र. १५

# पुलंच्या स्मरणार्थ आयुकात विज्ञान सप्ताह

म. टा. प्रतिनिधी

अष्टपैलू साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मदिनानिमित्त आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्राने (आयुका) पुलस्त्य विज्ञान सप्ताह जाहीर केला आहे. या निमित्ताने आठ ते तेरा नोव्हेंबर या काळात विज्ञानविषयक विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

आयुकाच्या मुक्तांगण विज्ञानशोधिकेच्या या उपक्रमात विज्ञानातील काही प्रयोग करुन दाखविले जाणार आहेत. त्याचबरोबर आकाशनिरीक्षणाची मूलभूत माहिती दिली जाणार नक्षत्रांबद्दलची माहिती गोष्टींच्या आणि नाट्यरुपांत सांगितली जाणार आहे. चंद्र, खगोलशास्त्रीय दुर्बीण, कृष्णविवर आदींबाबतची वैज्ञानिक माहिती देणारी व्याख्यानेही आयोजिली जाणार आहेत. त्याचबरोबर रात्रीच्या वेळी दुर्बीणीच्या साह्याने ताऱ्यांचा वेध घेतला जाणार आहे.

आयुकातील चंद्रशेखर सभागृह आणि विज्ञान वाटिकेत हे कार्यक्रम होणार असल्याचे आयुकाचे विज्ञान प्रसार अधिकारी अरविंद परांजपे यांनी सांगितले. या कार्यक्रमांसाठी शुल्क नाही; परंतु प्रथम येणाऱ्यास प्रवेश या तत्त्वाचा अवलंब केला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले. अधिक माहितीसाठी समीर धुर्डे किंवा अल्पना जोशी यांच्याशी ०२०-२५६०४१०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.